## प्रकरण चौथे

# बहिणाबाईंच्या काव्यातील प्रतिमा सृष्टी

## प्रकरण चौथे

# बहिणाबाईंच्या काव्यातील प्रतिमा सृष्टी

### प्रस्तावना

प्राचीन काळापासून स्त्रीचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले. प्राचीन काळी त्यांच्या रोजच्या जीवनाची सुरवात सकाळी दळण्यापासूनच व्हायची. रोज सकाळी घराघरातून जात्यांची घरघर ऐकू येत असायची. अशावेळी स्त्रिया कष्ट जाणवू नये म्हणून काहीतरी गुणगुणतं असायच्या आणि हे गुणगुणतांना त्या अनेक प्रतिमांचा वापर नकळत करायच्या.

बहिणाबाईंच्या कवितेमधील प्रतिमा संसाराशी, शेती, शेतकरी, गाव, माहेर, सासर यांच्याशी निगडीत आहेत. तसेच त्यांच्या काव्यामध्ये निसर्गप्रतिमा खूप आढळतात. त्यांनी रोजच्या जीवनातील साध्या सोप्या प्रतिमा वापरुन मानवाला जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगितले आहे. त्यांनी काव्यात ज्या प्रतिमा वापरल्या आहेत त्या प्रतिमांबद्दल त्यांच्या मनात उत्कट भावना, प्रेम, जिव्हाळा असल्याचे जाणवते.

### प्रतिमा म्हणजे काय ?

'प्रतिमा' म्हणजे काय तर ''आपण जेव्हा कविता वाचतो तेव्हा तिच्यातील काही शब्दांमुळे मनासमोर काही वस्तूंची किंवा घटनांची चित्रे तरळत असल्याचा अनुभव आपल्याला येतो. कविता वाचत असतानाच असे घडते असे नाही. दैनंदिन व्यवहारातही आपणांस असे अनुभव येतात यालाच 'प्रतिमा' असे म्हणतात.'' [१]

बहिणाबाईंनी आपल्या कवितेमध्ये दैनंदिन जीवनातीलच गोष्टी धरता प्रतिमा म्हणून वापरल्या आहेत. त्यांना जीवनात जे अनुभव आले ते व्यक्त करताना त्यांनी साध्या, सोप्या आणि अशा प्रतिमांचा वापर केलेला आहे. मराठी काव्यात प्रतिमेसंबंधी खूप विचार झाला आहे. प्रत्येकाने आपआपल्या दृष्टिकोणातून प्रतिमेची वेगवेगळी रुपे स्पष्ट केली आहेत. ''पाश्चात्य राष्ट्रांमध्ये सोळा, सतरा व अठराव्या शतकातील विचारवंतानी प्रतिमा म्हणजे अलंकार असे मानले. तर सी.डे. लेविस या विचारवंताने, 'काव्यात्मक प्रतिमान' या पुस्तकामध्ये, प्रतिमा ही काव्याला अलंकृत करते असे मत नमूद केले आहे.''[२] अशाप्रकारे प्रत्येक विचारवंताने आपआपल्या दृष्टिकोणातून प्रतिमेचे स्वरुप स्पष्ट केले आहे.

बहिणाबाईंनी आपल्या कवितेमध्ये प्रतिमांचा उपयोग विचार स्पष्ट करण्यासाठी, जीवनाचे तत्त्वज्ञान सांगण्यासाठी केला आहे.

## बहिणाबाईंच्या काव्यातील प्रतिमांचे स्वरुप

बहिणाबाईंनी आपल्या कवितेत ज्या प्रतिमा वापरल्या आहेत त्या प्रतिमांना विशिष्ट संदर्भ आहे. त्या प्रतिमांमधून त्यांचा सखोल अनुभव लक्षात येतो. त्याचप्रमाणे त्यांनी वापरलेल्या प्रतिमांमधून कल्पनाशक्ती व सूक्ष्म निरीक्षण दिसून येते. कौटुंबिक व्यक्तीच्या, निसर्गाच्या संबंधी देखील प्रतिमा त्यांच्या काव्यात आढळतात.

एखाद्या गोष्टीमध्ये असलेल्या गुणाचे वर्णन करताना त्यांनी अप्रतिम अशा प्रतिमा वापरल्या आहेत. त्यांच्या माहेरी जात असताना माहेरच्या वाटेवर 'लौकी नदी' आहे. त्या लौकी नदीचे पाणी किती गोड आहे हे सांगण्यासाठी त्यांनी 'अमृता'ची प्रतिमा योजली आहे.

''तापीवानी नही थडी

जरी वाहे थोडी थोडी

पानी 'लौकी'चं नित्तय

त्याम्ने अम्रीताची गोडी''[३]

या ठिकाणी त्यांनी तापी नदी आणि लौकी नदीची तुलना केली आहे. आपल्याला असे म्हणता येईल एखाद्या गोष्टीचे श्रेष्ठत्व सांगण्यासाठीही प्रतिमांचा वापर केला जातो. त्यांनी आसपासचं विश्व, घटना, व्यक्ती, निसर्ग ह्यानुसार प्रतिमा वापरल्या. त्याचं जीवन खेडेगांवाशी संबंधित असल्यामुळे त्या ठिकाणच्या व्यवसायांशी त्या निगडीत होत्या. ग्रामीण समाजातील मुख्य व्यवसाय शेती त्यामुळे त्यांच्या प्रतिमादेखील शेतीविषयक आहेत. पेरणी झाल्यानंतर रोपांच्या मुळाशी आसपासची माती सारण्यासाठी 'वखर' या साधनाचा उपयोग केला जातो. त्याचा उल्लेख त्यांनी केला आहे.

''वख्रर वखर

घाले मायेची पाखर''[४]

'वखर' म्हणजे फावड्यासारखी असणारी पट्टी, यामुळे रोपांच्या बाजूला असणारी माती, वख्रर फिरवल्यानंतर रोपांच्या मुळांवर ढकलली जाते. त्यांनी या ठिकाणी आईच्या प्रतिमा वापरली आहे. त्यांची 'घरोट' ही कवितादेखील अशीच प्रतिकात्मक आहे. त्या घरोट्याला जातं म्हणू नये असे म्हणतात. त्यांनी घरोट्यासाठी सुंदर प्रतिमा वापरल्या आहेत.

"माझा घरोट घरोट
दोन दाढा दोन व्होट
दाने खाये मूठ मूठ
त्याच्यातून गये पीठ"[५]

दोन पाळू म्हणजे दोन दाढा आणि धान्य घालण्यासाठी तोंड असते त्याठिकाणी दोन ओठ असतात. बाहेर, पाटाने पाणी जात असताना त्याला पाळण्यात खेळणाऱ्या बाळांची उपमा दिली आहे. बाळ ज्याप्रमाणे पाळण्यात हात पाय हालवून नाचत असते, त्याचप्रमाणे पाणी पाटाने हुंदडत जात असते. बहिणाबाईंची कल्पनाशक्ती अचाट होती.

बहिणाबाईंच्या कवितेमधील प्रतिमा आपल्याला कधी कधी विषण्णतेकडून एखाद्या सुखात्मक गोष्टीकडे घेवून जातात. त्याचप्रमाणे काही ठिकाणी या वाचकाला हसविण्याचे काम करतात विनोदाची निर्मिती करतात. त्यांनी स्फुट ओव्यांमधूनही प्रतिमांचा वापर केलेला आहे. त्यांनी 'खोकली माय' कवितेमध्ये जळगांवामध्ये आलेल्या खोकल्याच्या साथीचे वर्णन केले आहे. तेव्हा सर्व रस्त्यांवर, प्रत्येक घरोघरी लोक खोकल्याने वेडे झाले होते. आणि सर्वांच्या खोकल्याचा आवाज चौघडा ज्याप्रमाणे वाजतो त्याप्रमाणे येत होता त्यांनी खोकल्याच्या आवाजाला चौघड्याची प्रतिमा वापरली आहे.

बहिणाबाईंच्या काव्यामध्ये निसर्गातील प्रतिमा दिसून येतात. व्यक्तींचे गुण दोष दर्शविण्यासाठी, मानवाला तत्त्वज्ञान सांगण्यासाठी त्यानी प्रतिमांचा वापर केला आहे.

## तत्वज्ञान व प्रतिमा

बहिणाबाईंच्या कवितेमध्ये अनेक पैलू आहेत. ‘‘त्या एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तत्त्वज्ञान. त्यांच्या कवितेत मानवी जीवनासाठी आवश्यक असं तत्त्वज्ञान ठासून भरलेलं आहे. जीवन जगण्यासाठी आपल्याला हे तत्त्वज्ञान नक्कीचं मागदर्शन करते.’’[६] जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगताना त्यांनी ‘सुगरण’ या पक्षिणीची प्रतिमा वापरली आहे.

‘सुगरण’ पक्षीन आपल्या पिलांसाठी चोचीने सुंदर घरटे विणते आणि ते घरटे झाडाला टांगलेला झोकाच आहे असे बहिणाबाईनी वर्णन केले आहे. या सुगरण पक्षीनीला घरटे विणता येते. परंतु तिचा जन्मांचा सोबती म्हणून जो नर असतो त्याला मात्र खोपा विणता येत नाही. त्याचा उल्लेख त्यांनी ‘गण्यागंप्या’ असा केला आहे. सुगरण पक्षीनीचे वर्णन एखादया संसारी स्त्री सारखे केले आहे. त्याचबरोबर त्यांनी माणसाला उद्देशून जीवनाचे गहन तत्त्वज्ञान सांगितले आहे.

> ‘‘तिची उलूशीच चोच
> तेच दात, तेच ओठ
> तुले देले रे देवानं
> दोन हात दहा बोटं ’’[७]

बहिणाबाई माणसाला सांगतात, ‘अरे माणसा तिची छोटीशी जी चोच आहे तेच तिचे दात आहेत आणि तेच ओठसुद्धा, तरीही ती कलात्मक पद्धतीने खोपा विणते. पण हे माणसा तुला देवानं दोन हात आणि दहा बोटे दिली आहेत. तुला काम करण्यासाठी इतर अनेक साधने आहेत. पण तुला देवाने दिलेल्या साधनांचा उपयोग करावा असे वाटत नाही का ? ही कविता म्हणजे त्यांनी माणसाला जागृत करण्याच्या उद्देशाने केली असावी. यातून त्यांनी

मानवाला जीवनाचे तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांची तत्त्वज्ञान सांगणारी दुसरी कविता म्हणजे 'संसार', बहिणाबाई या कवितेमध्ये संसार म्हणजे काय ? याचे वर्णन करतात आणि त्यातून माणसाला तत्त्वज्ञानाचे डोस देतात. त्यांनी माणसाला समजावे म्हणून रोजच्या दैनंदिन जीवनातील, साध्या सोप्या प्रतिमांचा वापर केला आहे.

"अरे संसार संसार
जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताले चटके
तव्हा मियते भाकर"[८]

'संसार' म्हणजे फक्त सुख नाही. तर संसारात सुखापेक्षा दु:खचं जास्त असते. पण माणसाने सुख कमी आहे म्हणून खचून न जाता आलेल्या प्रसंगाला धैर्याने तोंड दिले पाहिजे तेंव्हा कुठे खरे सुख दृष्टीपथात येते. या ठिकाणी त्यांनी, 'तवा', 'भाकर' यासारख्या प्रतिमांच्या माध्यमातून मनुष्याला संसारात असणारे कष्ट, गांभीर्य सांगण्याचा प्रयत्न केला आहे. संसार हा कसा आहे तर जसा तवा चुलीवर असतो. सुरुवातीला भाकरी करत असताना हाताला चटके बसतात पण हळूहळू भाकरी करायची सवय झाली की आपोआप भाकरी येतात. त्याचप्रमाणे सुरुवातीला दु:ख हे असणारचं. दु:खा पाठोपाठ आपोआप सुख मिळणार. म्हणजे थोडे दु:खाचे चटके सहन केल्याशिवाय सुख मिळणार नाही.

त्या माणसाला म्हणतात, 'संसार ही अभिमानानं जगण्याची एक सुखद जाणीव आहे आणि त्याला तू गळ्यातले लोढणं म्हणतोस. अरे संसार करत असताना जीवनात दु:ख येणार पण त्याला घाबरुन पळून न जाता धैर्याने तोंड दे. रडत-कुढत बसू नको जे मिळाले आहे त्याचा आनंदाने स्वीकार कर. म्हणूनच तू गळ्यातल्या हाराला लोढणं म्हणू नको.' यातून त्यांनी आपल्याला संसाराची साधीसोपी व्याख्याच सुचविली आहे.

तुकाराम महाराजांनी सांगितले आहेचं की, "सुख पाहता जवाएवढे, दु:ख पर्वताएवढे" त्याचप्रमाणे बहिणाबाई म्हणतात थोडेसे दु:ख झाले तरी त्याला पर्वताएवढे करू नका. त्या म्हणतात, 'आपण देवळाच्या कळसाला कधी लोटा म्हणतो का ?' त्याचप्रमाणे वेलाची काकडी एका बाजूला कडू असते. परंतु बाकी सर्वच गोड असते. संसारातील सुखाचा शोध घेत असताना ते वरून वरून दु:खदायक वाटते. परंतु ते सागरगोट्याप्रमाणे असते. सागरगोट्यांच्या शेंगेला वरून काटे असतात पण आत सुंदर सागरगोटे असतात. त्याचप्रमाणे हा संसार आहे. त्यांनी संसारातील सुख दु:खाचे वर्णन करण्यासाठी सुंदर व आशययुक्त प्रतिमांची रचना केली आहे. या प्रतिमांची मांडणी साधी-सोपी आहे.

"ऐका संसार संसार
दोन्ही जीवाचा इचार,
देतो दु:खाले होकार
अन् सुखाले नकार "[१]

संसार म्हणजे काय ? तर, संसार म्हणजे दोन जीवाचा विचार. दोन जीव म्हणजे पती आणि पत्नी. संसारात पती-पत्नीने एकमेकांना साथ देणे फार आवश्यक आहे. प्रत्येक घरात दृष्टीस पडणाऱ्या दैनंदिन व्यवहारातील गोष्टीचा प्रतिमा म्हणून वापर केला आहे. आपल्या आनंदाच्या क्षणी सर्वांची सोबत मिळते. आपल्याजवळ सर्वजण येतात मात्र दु:खाच्या क्षणी कोणी जवळ येत नाही. त्यावेळी फक्त पती-पत्नीचं एकमेकांचे दु:ख हलके करतात. म्हणूनच या दु:खात आपल्याला जवळच्या माणसांची आवश्यकता असते. आपल्या माणसाने दु:खाचे ओझे किंचितसे तरी कमी होते. हजारो संकटे समोर आली तरी हसत सामोरे जातो. "बहिणाबाईंसारख्या अक्षरांची ओळखदेखील नसलेल्या स्त्रीने संसार चांगला होण्यासाठी दु:खात एकमेकांची साथ देण्यासाठी आणि एकमेकांची दु:खे

झेलण्यासाठी दोन जीवांनी एकत्र येणे आवश्यक आहे असे सांगितले आहे.''[१०] त्यांनी संसाराचं असे नेमक्या शब्दांत वर्णन केले आहे. बहिणाबाईंनी आपल्या कवितेत ज्या प्रतिमा साकारल्या आहेत त्या सर्व प्रतिमांनाचे अधिष्ठान त्यांना जो अनुभव आला ते आहे. त्यांची 'मोट हाकलतो एक' ही कविता अनुभवातूनचं रेखाटलेली आहे. एका मोटेचे उदाहरण देऊन जीवनाचे तत्त्वज्ञान त्यांनी मांडले आहे. विहिरीमध्ये दोन मोटा आहेत. त्या दोन्ही मोटातलं पाणी एकच आहे आणि दोन्ही मोटेमधील नाडा आणि समदूर यांची झीज होते ती एकाच प्रकारे होते. दोन्ही बैल मोट ओढत असताना त्यांची ओढ एकचं असते. चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी एकचं धाव असते. या सर्वांचं जीवन एकाच प्रकारचं कसं आहे ? असा प्रश्न बहिणाबाईंना पडतो.

''मोट हाकलतो एक
जीव पोसतो कितीक''[११]

मोट हाकणारा एकच आहे पण त्यामधून किती जीव पोसले जातात त्यांनी या कवितेमधून अनेकत्वांतून एकत्व सिद्ध केले आहे. त्यांनी 'मोटेची प्रतिमा वापरून समाजातील लोकांना तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ही सर्व चराचर सृष्टी सांभाळणारा परमेश्वर एकच आहे. पण आपण त्याच्या जीवावर जगणारे किती आहोत. हे त्यांनी अत्यंत मार्मिक शब्दांत मोटेचे उदाहरण देवून पटवून सांगितले आहे.'

आज सद्य परिस्थितीमध्ये प्रत्येक माणूस एकमेकांचा शत्रू बनला आहे. मी श्रीमंत, तू गरीब. मी मालक तू नोकर असा माणसामाणसांत भेदभाव आज आपल्याला दिसून येतो. अशावेळी बहिणाबाईंनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानाची आठवण होते. खरोखरच त्यांच्या 'मोट हाकलतो एक' या कवितेमधील शेवटच्या दोन ओळीमुळे वेगळीच कलाटणी मिळते.

वर बसलेला परमेश्वर आपल्या मोटेतून असंख्य जीवांना जीवनरस देत असतो. किती गहन अर्थाचे तत्त्वज्ञान त्यांनी या ठिकाणी मांडले आहे. बहिणाबाईंनी मानवी 'मनाचा' शोध घेत असताना मानवी मनाचे एकेक वैशिष्ट्य नजरेसमोर आणले आहे. 'मन' या कवितेमध्ये त्यांनी 'पीक', 'ढोर', 'विंचू', 'साप', 'आभाय' यासारख्या प्रतिमांच्या माध्यमातून मनाचे एकेक पैलू आपल्या समोर उलगडून दाखविले आहेत.

''मन वढाय वढाय
उभ्या पीकातलं ढोर
किती हाकला हाकला
फिरी येत पिकावरं''[१२]

वरील काव्यपंक्तीमध्ये मन 'उभ्या पीकातल्या ढोरा'सारखे असल्याचं त्या सांगतात. मन ओढाळ असल्यामुळे उभ्या पिकातल्या ढोरासारखे मोकाट सुटलेले असते. मनाच्या ओढाळपणांसाठी समर्थक असे त्यांनी उभ्या पिकातल्या ढोराची उपमा दिली आहे. मनाला कसलेही बंधन नसते. त्यामुळे ते कुठेही फिरत असते. त्याला अनेक वाटा असतात हे सांगण्यासाठी त्यांनी पाण्याच्या लाटेचे उदाहरण दिले आहे. पाण्यांच्या लाटा ज्याप्रमाणे एका ठिकाणी स्थिर नसतात सतत हालत असतात त्याप्रमाणेच हे मन एका ठिकाणी स्थिर राहत नाही. ते चंचल असते. त्याला कोणी धरू शकत नाही. वाऱ्या-वादळासारखे ते झेपावत राहतं. अशा या मनाचा लहरीपणा वर्णन करताना बहिणाबाई म्हणतात, या मनाचे जहर एवढे वाईट आहे की त्याच्यापेक्षा विंचू किंवा सापाचे जहर बरे. कारण ते काहीतरी करून उतरवता तरी येते. पण मनामध्ये एखाद्याबद्दल वाईट निर्माण झाले तर ते जाता जात नाही. असे हे मनाचे विष जहाल आहे. या मनाच्या विषावर कोणताही मंत्र नाही. असं हे 'मन' आहे. त्यांनी मनाला पाखरांची, विजेची उपमा दिली आहे. त्यांनी टिपलेली ही मनाची

चंचलता, चपलता खूप समर्थ अशी आहे. अशा या मनाचा क्षुद्रपणा दाखविण्यासाठी 'खसखशीच्या' दाण्याचे उदाहरण दिले आहे. तर मनाचा मोठेपणा किंवा मन किती विशाल आहे हे सांगण्यासाठी आकाशाचं उदाहरण दिले आहे. अशा या मनाची जडण-घडण करणे म्हणजे ते परमेश्वराला जागेपणी पडणाऱ्या स्वप्नासारखे आहे. त्यांनी माणसाचं मन कसं आहे हे सांगण्यासाठी, ढोरं, विंचू, साप, आकाश, खसखस, वारा यासारख्या प्रतिमा वापरल्या आहेत. या प्रतिमा दैनंदिन जीवनातील आहेत.

**निसर्ग प्रतिमा**

त्यांनी आपल्या कवितेमध्ये निसर्ग प्रतिमांचा वापर मोठ्या प्रमाणात केलेला आहे. त्यामुळेच बहिणाबाईंना निसर्गकन्या म्हटलं जातं. त्या निसर्गाशी पूर्णपणे एकरुप झाल्या होत्या. त्यांच्या कवितेमधून जो निसर्ग येतो तो अगदी जसा आहे तसाच. त्यामध्ये कुठेही कृत्रिमता जाणवत नाही. त्यांच्या कवितेमधील निसर्ग एखाद्या गोष्टीची उपयुक्तता पटवून देतो. त्याचप्रमाणे त्यांनी निसर्गप्रतिमांच्या माध्यमातून मानवाला मौलिक उपदेश केले आहेत. त्यांनी निसर्गविषयक कवितेमध्ये वारा, धरती, पाऊस, आकाश, विविध वृक्षवेली, झाडेझुडपे, नदी इ. घटकांच्या प्रतिमा आपल्यासमोर मांडल्या आहेत.

बहिणाबाई जे जीवन जगल्या, अनुभवले त्यामधूनच त्यांची काव्य रचना साकार झाली आणि त्याच गोष्टींचा उपयोग प्रतिमा म्हणून त्यांनी कवितेमध्ये केला. बहिणाबाईंना घरातील त्याचबरोबर शेतातीलही सर्व कामे करावी लागतं. शेती करताना आलेले अनुभव त्यांनी काव्यरुप केले ते पुढीलप्रमाणे. पेरणीच्या वेळी अचानक वारे सुटते आणि 'पावश्या' पक्षी ओरडत सुटतो. 'पेरते व्हा', 'पेरते व्हा' आणि पेरणी सुरु होते. पीकं मोठी झाल्यानंतर कापणी येते आणि त्यानंतर रगडणी, उपनणी येते. उपनणीसाठी वाऱ्याची आवश्यकता

असते. तेव्हा त्या वाऱ्याला मारोतीचा बापा असे संबोधतात आणि त्या सांगतात वारा आल्याचे मला झाडाची पाने सांगतात.

शेता-शिवारांतील झाडांशी, वृक्ष-वेलींशी बहिणाबाईंची खूप मैत्री होती. त्यांच्या विहिरीच्या धावेवर गुलमोहराचा वृक्ष होता. त्याला त्या 'फुलाजीबोवा' आणि 'फुलाजीमहाराज' असे संबोधित त्याचे झाडावर वृक्षावर खूप प्रेम होते. या ठिकाणी फुलांनी भरलेल्या गुलमोहरांच्या झाडांला 'फुलाजीमहाराज' ही दिलेली उपमा खरोखरचं अवर्णनीय आहे. फुललेल्या गुलमाहेरांचा लाल-शेंदरी रंगामुळे तो वृक्ष जणू एखाद्या महाराजासारखाचं वाटतो. यातून त्यांची कल्पनाशक्ती किती प्रगल्भ होती हे दिसून येते. जीवनात निसर्गातील प्रत्येक सूक्ष्म गोष्टीचे निरीक्षण करूनच त्यांनी प्रतिमा वापरल्या आहेत. निसर्गाविषयीचे त्यांचे निरीक्षण सूक्ष्म होते. बहिणाबाईंनी कवितेमध्ये प्रतिमांचा वापर करत असताना अतिशय समर्पक अशा व्यवहारातील गोष्टीचा अगदी नैसर्गिक वापर केला आहे व आपल्या आर्त भावनांचे प्रकटीकरण केले आहे.

बहिणाबाई एखाद्या व्यक्तीच्या स्वभावदोषाचे वर्णन करतांनासुद्धा निसर्गातीलच प्रतिमानांचा वापर करतात.

> "कडू बोलता बोलता
> पुढे कशी नरमली
> कडू निंबोयी शेवटी
> पिकीसनी गोड झाली"[१३]

त्यांनी या स्फूट ओव्या अनुभवांतून रचलेल्या आहेत. रोजच्या जीवनात अनेक व्यक्तीशी त्यांचा संबंध येई. त्या त्याचे सूक्ष्म निरीक्षण करून त्याच्या एखाद्या गुण-दोषावर काव्य रचित.

वरील ओवीमध्ये त्यांनी ''एका स्त्रीच्या बोलण्याच्या वागण्याच्या पद्धतीत झालेलं परिवर्तन सूचित केले आहे. सर्वांशी अगदी कडवट, बोचक शब्दात बोलणारी ही स्त्री. काही दिवसांनी आपला सगळा तोरा विसरुन शेवटी ती सगळ्यांबरोबर गोड बोलू लागते.''[१४] त्या सर्वासाठी त्यांनी 'कडू निंबोयीची उपमा वापरली आहे. निंबाच्या झाडाचा गुणधर्मच असा आहे की ते कडूच असते. परंतु निंबोयी ही सुरुवातीला कडू असते. परंतु पिकल्यानंतर ती गोड होते. निंबाच्या झाडाचे, निंबोयीचे नेमके वैशिष्ट्य लक्षात घेऊन त्यांनी वरील प्रतिमा वापरली आहे. त्यांनी त्या विविध प्रतिमा आपल्या कवितामधून वापरल्या आहेत. या वैशिष्ट्यपूर्ण आणि साध्या-सोप्या सर्वांना सहज समजतील अशा आहेत.

आपल्या आई-वडिलांबद्दल आत्यंतिक श्रद्धा त्यांच्या मनात होती. आपल्या आईबद्दलचे प्रेम, वात्सल्य व्यक्त करताना त्या म्हणतात,

''माय भिमाई माऊली
जशी आंब्याची सावली
आम्हाईले केलं गारं
सोता उन्हात तावली ''[१५]

त्यांनी आईला आंब्याच्या झाडाच्या सावलीची उपमा दिली आहे. आंब्याच्या सावलीमध्ये कोणालाही थंडावा मिळतो. मनाला एक तरतरीतपणा येतो. त्याचप्रमाणे आपल्या आईची माया आहे असे बहिणाबाई म्हणतात. आंब्याचे झाड स्वत:

ऊनात असते परंतु येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरुला मात्र थंडगार सावली देते. त्याचप्रमाणे आई स्वतः सर्व दुःखे सहन करून इतर सर्वांना माया, प्रेम देते. त्यांनी आईला 'आंब्याच्या सावलीची' उपमा दिलेली आहे. बहिणाबाई माहेरी जात असताना, रस्त्याच्या कडेच्या वृक्षांशी हितगुज करीत जात असत. जणू ती झाडे बहिणाबाईंची माहेरची माणसे आहेत. असेच रस्त्याच्या बाजूला एक शेवरीचे झाड उगवलेले होते. त्या झाडाला त्यांनी 'उपवर मुलीची' उपमा दिली होती. त्याचप्रमाणे त्यांच्या मळ्यात एक खिरणीचा वृक्ष होता त्याला त्या 'दुभती' असे संबोधित असत. त्याचप्रमाणे त्यांनी वडाच्या वृक्षाची पिढी-पिढीचा अन् लांब दाढीचा अशी प्रतिमा रेखाटली आहे. केळीच्या झाडाला 'लेकुरवाळी रंभा' असे त्या म्हणत. निसर्ग हाच बहिणाबाईंच्या कुटुंबाती जणू एक घटक होता. त्या एखादी गोष्ट पटवून देण्यासाठी 'सत्याची महती असणाऱ्या गोष्टीचा प्रतिमा म्हणून त्यांनी उपयोग केला आहे.'

''जन्मदात्या मायजागी सावतर माय आल्या
जशा खिरनीच्या झाडाले निंबोया आल्या''[१६]

आईच्या प्रेमाचे महत्व सांगणारी ही बहिणाबाईंची म्हण आहे. आईच्या प्रेमाची, वात्सल्यतेची महती सर्वांनी आपल्या काव्यातून व्यक्त केलेली आहे. परंतु काही वेळेला आईचे हे मातृछत्र अकालीच हरपले जाते आणि त्याठिकाणी दुसरी आई आणली जाते. परंतु त्या प्रेमाची सर, सावत्र आईच्या प्रेमाला येत नाही. हे दाखविण्यासाठी त्यांनी खिरणी आणि निंबोयीचं उदाहरण दिले आहे. कारण निंबोयी ही अत्यंत कडू असते. व खिरणी ही मुळातच खायला खूपच गोड असते. म्हणूनच त्यांनी निंबोयीला सावत्र आईची उपमा दिली व खिरणीला जन्मदात्या आईची उपमा दिली आहे. जन्मदात्या आईसारखं प्रेम मिळणं अशक्य

आहे असे बहिणाबाईंना या ठिकाणी सुचवायचे आहे. त्यासाठी त्यांनी खिरणी व निंबोयी या झाडांच्या प्रतिमा वापरल्या आहेत.

मानवी जीवन जगत असताना ते तोलामोलाचं असावं हे सांगण्यासाठी त्यांनी 'आभाळ' आणि 'धरती' यांच्या प्रतिमा वापरल्या आहेत.

''जग जग माझ्या जीवा
असं जगणं तोलाचं
उंच गगनासारखं
धरत्रीच्या रे मोलाचं''[१७]

मानवी मन हे आभाळासारख विशाल असाव. त्याचप्रमाणे मानवाच जगण हे धरतीच्या मोलाचं असावं म्हणजे धरती ज्याप्रमाणे आपल्या अंगाखांद्यावर सर्व प्रकारच्या जीव जंतूना सामावून घेते त्याप्रमाणे मानवाने भेदभाव विसरून सगळ्यांशी मिळून-मिसळून वागावे. मानवाचे विचार हे उंच आकाशाला गवसणी घालण्यासारखे असावेत.

बहिणाबाईंच्या पतीचे निधन झाले त्यावेळी त्या धरतीला प्रश्न विचारतात. झाडं पुढे निघून गेले आणि पाठीमागे फक्त सावली उरली. त्यांनी पतीसाठी झाडं अशी प्रतिमा वापरली आहे आणि आपण स्वत: म्हणजे सावली असा उल्लेख त्यांनी केला आहे.

त्यांनी 'खरा देवामधी देव' या 'कानोड' या देवतेची व विठ्ठलाची तुलना करताना निंबाची निंबोळी आणि बोरशाचा आंबा अशी प्रतिके वापरली आहेत. कडू निंबाची निंबोयी आणि बोरशाचा आंबा यांची तुलनाच होऊ शकणार नाही. कारण निंबोयी ही कडू असते, तर बोरशाचा आंबा हा गोड असतो. त्याप्रमाणे 'कानोड' आणि 'विठ्ठल' यांची तुलनाच होऊ शकणार नाही असे त्यांनी या ठिकाणी सांगितले आहे.

शेतातून जाणारी वेडी-वाकडी पायवाट पाहून त्यांना सुचलेली कल्पना किती मार्मिक आहे. वाकड्या-तिकड्या वाटेला त्या सरपटत जाणाऱ्या सापाची उपमा देतात. बहिणाबाईंची प्रतिमा सृष्टी, निसर्गातील वस्तुस्थितीवर प्रकाश टाकणारी आहे.

त्यांनी स्फुट ओव्यामधूनही माणसांच्या प्रवृत्ती, त्याचं वागणं, चालणं, बोलणं इ. चा उल्लेख आपल्या कवितेमध्ये केलेला आहे. बहिणाबाई अशाच एका कुटुंबाचे वर्णन करतात. त्या कुटुंबामध्ये सर्वजण गोरे आहेत. पण एकच कोणीतरी काळे आहे. तेव्हा, पांढऱ्याशुभ्र ज्वारीच्या कणसांत कान्हीच काळ कणीसं कस ? असे त्यांनी सांगितले आहे.

"घरमधी सर्वे गोरे
तूच कशी कायीधूस
उज्या जवारीत आलं
जसं कान्हीचं कनूस"[१८]

बहिणाबाईंना असं कुटुंब पाहिल्यानंतर ज्वारीच्या कणसांची आणि कान्हीच्या कणसांची आठवण होते. त्यांनी ज्या निसर्ग प्रतिमा वापरल्या आहेत त्या त्यांना सहजपणे स्फुरल्या आहेत. त्या स्वत: निसर्गातील जीवन जगल्या आहेत. त्यामुळे त्यांनी त्यातील प्रतिमा चोखंदळपणे चित्रित केल्या आहेत. त्यांनी वापरलेल्या प्रतिमांमध्ये आत्मीयता दिसून येते.

**काही व्यक्तिविषयक प्रतिमा**

बहिणाबाईंच्या प्रतिमासृष्टीचा बराच भाग कौटुंबिक प्रतिमासृष्टींनी व्यापलेला आहे. कुटुंबातील विविध व्यक्तीचे, त्यांच्या भावस्थितीचे त्यांच्या चालण्या, बोलण्यातील सवयीचे वर्णन करताना त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिमा वापरल्या आहेत. जीवनात अनेक व्यक्ती

भेटतात. प्रत्येक व्यक्तीची काही अंगभूत वैशिष्ट्य असतात. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही गुण काही दोष असतात. त्यांचेच चित्रण त्यांनी आपल्या काव्यात केले आहे.

## सासू

प्रत्येक कुटुंबामध्ये सासू-सुनेचे नातं तसं वेगळचं असते असे आपण बऱ्याच ठिकाणी पाहतो. सासू-सुनेच्या नात्याच्या वर्णनात नेहमी त्रास देणे, छळणे इ. या गोष्टीच आपल्याला जास्त प्रमाणात दिसून येतात. परंतु बहिणाबाई आपल्या सासूबाईविषयी अत्यंत आदराची भावना व्यक्त करतात. आपली सासूबाई म्हणजे 'माझी जन्मदाती' आईच आहे असे म्हणतात. आपल्या सासूबाईचा स्वभाव किती चांगला होता हे सांगण्यासाठी त्यांनी 'देवगाय' हा शब्द वापरला आहे.

## नणंद

बहिणाबाईंची नणंद कासाई ही दिसायला अतिशय सुंदर होती. सामान्यत: कोणतीही सुंदर स्त्री दिसली की तिला साक्षात 'इंद्राची परी' असा म्हणण्याचा प्रघात आहे. त्याचप्रमाणे बहिणाबाई देखील आपल्या नणंदेचे रुप म्हणजे साक्षात इंद्राच्या परीसारखे आहे. त्याचप्रमाणे कासाई ही खूप नाजूक आहे. जसं चंबेलीचं फुल असते. त्यांनी आपल्या नणंदेच्या रुपाने कौतुक करत असताना 'इंद्राच्या परीची' आणि 'चंबेलीच्या फुलाची' प्रतिमा वापरली आहे.

## पानाई (मोठी जाऊ)

''माझी जेठानी 'पानाई'
कशी मनातली गोट''[१९]

आपल्या मोठ्या दिरांच्या बायकोला 'जेठानी' असे खेडेगावात म्हटले जाते. आपल्या "जेठानीला त्यांनी मनातल्या गोष्टीची उपमा दिली आहे. मनातली गोष्ट म्हणजे आपल्या अगदी जवळची लाख मोलाची मनोमन जपण्याची आणि केवळ आपल्यालाच माहीत असणारी समजणारी." आपल्या मोठ्या जाऊचं वर्णन करताना त्यांनी मोठ्या दिराचेही वर्णन केले आहे. बहिणाबाई श्रद्धाळू असल्यामुळे त्यांनी दिराला 'पांडूरंगा'ची उपमा दिली आहे. त्यांच्या बरोबरच त्या पानाईला 'रुखमाई' असे संबोधतात.

"जसे वाड्यात सोभती पांडुरंग रुखमाई"

## सीताई (सून)

बहिणाबाई सांगतात, सीताई ही अत्यंत उदार अत्यंत प्रेमळ होती. तिचं मन मोठं होतं आणि देवानं तिला गोड स्वभाव दिला होता. त्या स्वभावाचे वर्णन करताना, तिचा स्वभाव 'खडीसाखरेसारखा' आहे असे म्हटले आहे. त्यांनी आपल्या काव्यातील व्यक्तीच्या स्वभावानुसार त्यांनी 'प्रतिमा' वापरलेल्या आहेत. त्यांची निरीक्षण शक्ती खूप सूक्ष्म होती.

## ठमाबाई

बहिणाबाईंनी या ठमाबाईंचं आगळ वेगळं दर्शन घडविले आहे. ती एकदम रोखठोक बोलत असली पाहिजे. ठमाबाई ही दिसायला जरा वेगळीच होती. तिचे डोळे भोकरासारखे होते तर तिची नजर वाघासारखी होती. ठमाबाई रागात आली की, एखाद्या पिशाचिनीसारखी घुमते एखादी व्यक्ती कारण नसताना उगाचचं आरडाओरड करायला लागली की असेच का पिशाचिनीसारखी वागतेस असा शब्दप्रयोग केला जातो.

**धुडाबोय**

'धुडाबोय' या व्यक्तीचित्रणामध्ये अत्यंत खुज्या म्हातारीचे वर्णन केले आहे. बहिणाबाई म्हणतात ही धुडाबोय केवढी ? तर –

''म्हनू नका रे केवढी
भुई-रिंगनी एवढी ''[२०]

भुई रिंगनी म्हणजे 'भिंगरी' किंवा 'भोवरा'. त्यांनी धुडाबोयला भुई रिंगनीची प्रतिमा दिलेली आहे. कारण भिंगरी सतत गोल फिरते आणि ती जमिनीबरोबर फिरत असते. धुडाबोय ही उंचीने कमी आणि सतत फिरणारी अशा वृत्तीची असली पाहिजे.

**छोटू भैय्या**

बहिणाबाईंनी छोटू भैय्याचे जे वर्णन केलेले आहे ते अगदी मजेशीर आहे. त्याने लाल कानटोपी घातल्यानंतर त्याचे तोंड चकरीच्या भाजीसारखे दिसते. त्यांच्या नाकाची ठेवण भज्या-गुलगुल्या प्रमाणे आहे. कारण भजे व गुलगुले यांचा आकार बेढब असतो, त्याचप्रमाणे त्याच्या नाकाची ठेवण आहे.

त्यांनी प्रत्येक व्यक्तीचे चित्रण वैशिष्ट्यपूर्ण केले आहे. प्रत्येकांची स्वभाववैशिष्ट्ये, त्यांच्यातील गुण, दोष त्यांनी अगदी सूक्ष्मतेने टिपलेले आहेत. कवितेमध्ये ज्या प्रतिमा वापरल्या आहेत त्या रोजच्या जीवनातील, निसर्गातील आहेत. त्यामुळेच त्यांच्या कवितेचे आकलन करणे सोपे जाते.

**समारोप :**

बहिणाबाईंच्या प्रतिमांचे मूल्यमापन करीत असताना आपल्याला असे दिसून येते की, त्यांनी या कवितामधून काही विशिष्ट प्रतिमा साकारून समाजाला उपदेश केले आहेत. कलावंत ज्या वातावरणात घडतो त्या वातावरणाचा फार मोठा परिणाम त्याच्या व्यक्तीत्वावर व कलानिर्मितीवर होत असतो. त्यामुळेच बहिणाबाईंच्या कवितेमध्ये आसपासचा निसर्ग, समाजजीवन, व्यवसाय इ. उल्लेख येतात.

त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान थेट त्यांच्या अनुभवातूनचं जन्माला आले आहे. त्यांनी कवितेत ज्या प्रतिमा वापरल्या आहे त्या त्यांना रोजचे जीवन जगत असताना येणाऱ्या अनुभवावरून विविध नमुने, घरातील कामे करताना, शेतात घाम गाळतांना, रोजच्या जीवनसंघर्ष करताना आले तेच काव्यरुप झाले. त्यांच्या कवितेमधीन प्रतिमा आपल्याला कुठेही स्वप्नरंजनात गुंतवून ठेवत नाहीत.

त्यांनी ज्या प्रतिमा वापरल्या आहेत त्यामधून आपल्याला जीवनाचा संदेश मिळतो. त्याचप्रमाणे त्या प्रतिमा आपल्याला आशावादी, जीवनाला सामोरे जायला शिकवतात.

--------

## प्रकरण चौथे
## संदर्भ


१. सुधीर रसाळ, कविता आणि प्रतिमा, मौज प्रकाशन, पहिली आवृत्ती, जून, १९८२, पृ.क्र. २००

२. मालती पाटील, तुकारामांची प्रतिमानसृष्टी व त्यांच्या काव्यात्मशक्तीचे मूल्यमापन, प्रकाशन - १९७४

३. चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योती पिरिऑडिकल्स, आवृत्ती चौथी, १९८२, पृ.क्र. ६.

४. तत्रैव, पृ.क्र. २९.

५. तत्रैव, पृ.क्र. १८,१९.

६. आशालता कांबळे, बहिणाबाईंची कविता : एक आकलन, अश्वमेध प्रकाशन, प्रथमावृत्ती, एप्रिल, २०००, पृ.क्र. ११.

७. चौधरी बहिणाबाई , बहिणाईची गाणी, ज्योती पिरिऑडिकल्स, आवृत्ती चौथी, १९८२, पृ.क्र. ४३.

८. तत्रैव, पृ.क्र. १३.

९. तत्रैव, पृ.क्र. १४.

१०. आशालता कांबळे, बहिणाबाईंची कविता : एक आकलन, अश्वमेध प्रकाशन, प्रथमावृत्ती, एप्रिल, २०००, पृ.क्र. १३.

११. चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योती पिरिऑडिकल्स, आवृत्ती चौथी, १९८२, पृ.क्र. ४२.

१२. तत्रैव, पृ.क्र. २०.

१३. तत्रैव, पृ.क्र. १०१.

१४. प्रमिला भिरुड, बहिणाअीची गाणी एक अभ्यास, व्यंकटेश प्रकाशन, प्रथमावृत्ती ४ ऑगस्ट, २०००, पृ.क्र. १६६.

१५. चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योती पिरिऑडिकल्स, आवृत्ती चौथी, १९८२, पृ.क्र. ५.

१६. तत्रैव, पृ.क्र. १२५.

१७. तत्रैव, पृ.क्र. १६.

१८. तत्रैव, पृ.क्र. १०३.

१९. तत्रैव, पृ.क्र. १११.

२०. तत्रैव, पृ.क्र. ११८.

------